Hindustan Page No.10 dated 27-2-19

# प्रो. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेमध्ये आशये चे उद्घाटन



अमरावती दि.२६ : स्थानिक प्रो. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेमध्ये आशये चे थाटात उद्घाटन पार पडले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पदवी वितरण सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष नितीन धांडे, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सदस्य नितीन हिवसे, ॲड उदय देशमुख, प्रा. गजानन काळे, प्रा. रागीणी देशमुख, प्राचार्य डॉ. अमोल बोडखे आदी मान्यवर उपस्थित होते.

आशये दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य अमोल बोडखे यांनी अहवाल वाचन केले व कार्यक्रमाची माहिती दिली. नितीन हिवसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात. सचिव युवराज सिंग यांनी विद्यार्थ्यांमध्ये असामान्य प्रतिभा असल्याचे प्रतिपादन केले. पंकज देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे असे आवाहन केले. डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना आपल्या पालकांचे स्वप्न साकार करा असे आवाहन केले. यानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. धांडे यांनी कठोर परिश्रमातून यश मिळवता येते त्याकरीता संस्था, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन व आभार डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

Vrutta kesari Page No.7 dated 27-2-19

# प्रो.राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेमध्ये आशायेचे उदघाटन

प्रतिनिधी / २६ फेब्रुवारी

**अमरावती :** विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी चे अध्यक्ष डॉ नितीन धांडे, उपाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, कोषाध्यक्ष श्री. पंकज देशमुख, सचिव युवराजसिग चौधरी , संचालक मंडळातील कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, मा. ॲड. उदय देशमुख, प्रा.गजानन काळे.प्रा.रागिणी देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यात डॉ अमोल बोडखे, यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे आयोजन दर वर्षी करण्यात येते.याचाच भाग म्हणून यावर्षी आशये या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली.





यावेळी मान्यवरांचे स्वागत महाविद्यालया तर्फे करण्यात आले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ चंद्रशेखर देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी कार्यक्रमाची माहिती दिली .यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .अमोल बोडखे यांनी महाविद्यालयाचा प्रगती अहवाल वाचला.यावेळी संस्थेचे कार्यकारी सदस्य नितिन हिवसे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या संस्थेचे सचिव युवराज सिग चौधरी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थानमध्ये असामान्य प्रतिभा असल्याचे मत व्यक्त केले. व कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.संस्थेचे कोशाध्यक्ष पंकज देशमुख यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वाचनाकडे वळावे व वाचनाची सवय लावावी, असे आवाहन केले संस्थेचे उपाध्यक्ष प्रा डॉ. हेमंत देशमुख, यांनी विद्यार्थानाशुभेच्छादिल्या. पालकांच्यामेहनतीचे चीज करा संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी कठोर परिश्रम करून यश मिळवता येते महाविद्याल्याच्या यशात विद्यार्थी , प्राचार्य , प्राध्यापक, व कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असल्याचे म्हटले गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पदवी वितरण समारंभाला परिश्रम घेतले त्यांचा सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाला डॉ. एम.एस.अली, तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.